Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 10 January 2026

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १० जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून तीन दिवसाच्या गुजरात दौऱ्यावर आहेत. या दरम्यान ते सोमनाथ स्वाभिमान पर्वासहित अनेक कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत. यात राजकोट, अहमदाबाद आणि गांधीनगर इथल्या विकास कार्यक्रमांचा तसंच राजकीय कार्यक्रमांचा समावेश आहे. गुजरात इथल्या चार दिवसीय सोमनाथ स्वाभिमान पर्व ला गुरुवारी ८ तारखेला प्रारंभ झाला असून इसवी सन १ हजार २६ मध्ये सोमनाथ मंदिरावर महमूद गजनीने केलेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर हे पर्व आयोजित करण्यात आलं आहे.

***

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पुणे महापालिका निवडणुकीसाठी पक्षाचा जाहीरनामा मांडला. 'अष्टसूत्री प्रगती' म्हणजेच विकासाचे आठ स्तंभं आणि आठ दिशेचं सजग नेतृत्व या तत्त्वांवर हा जाहीरनामा आधारीत आहे. या जाहीरनाम्याने पुणेकरांच्या अपेक्षा आणि स्थानिक समस्यांवर उपाय सुचवले आहेत. दररोज पाणीपुरवठा, वाहतूककोंडी आणि खड्डेमुक्त रस्ते, स्वच्छतेचा विज्ञाननिष्ठ आराखडा,उच्चदर्जाची आरोग्य सेवा, प्रदूषणमुक्त, उत्तम पर्यावरणयुक्त पुणे, झोपडपट्टी पुनर्वसन-पुनर्विकास आणि पुणेकरांसाठी जबाबदार प्रशासन निर्मिती तसंच पालकांवर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार नसलेली पुणे मॉडेल शाळा ही अष्टसुत्री जाहीरनाम्याचा केंद्रबिंदू आहे.

***

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनाच्यावतीने मुंबईतल्या उल्हासनगर इथं उपमुख्यमंत्री तथा शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी काल जाहीर सभा घेतली. या सभेत मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठी तसंच सिंधी समाजाच्या एकतेवर भर देत उल्हासनगरच्या सर्वांगीण विकासाचा ठाम निर्धार व्यक्त

केला.‘लाडकी बहिण’ ही योजना कोणत्याही परिस्थितीत बंद होणार नाही, याचा पुनरुच्चार करुन महिलांना आत्मनिर्भर बनवणे हाच या योजनेचा उद्देश असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

***

ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्ताननं आपलं सैन्य आणि संवैधानिक संरचनेत गतीनं बदल करुन संघर्षादरम्यानच्या आपल्या गंभीर उणीवा स्वीकारल्या असल्याचं लष्करप्रमुख जनरल अनिल चौहान यांनी म्हटलं आहे.पुणे इथं लोकनीती समारोहात काल ते बोलत होते. गेल्या वर्षी एप्रिल महिन्यात पाकिस्ताननं केलेल्या आतंकवादी हल्ल्यानंतर भारतानं ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून दिलेल्या चोख प्रत्युत्तरानं पाकिस्तानला संवैधानिक संशोधन करायला भाग पाडलं असल्याचं जनरल चौहान यांनी सांगितलं. पाकिस्ताननं आपल्या संविधानातल्या अनुच्छेद २४३ मध्ये संशोधन करत 'संयुक्त सेनाध्यक्ष समिती'चं अध्यक्षपद समाप्त केलं असून त्या जागी संरक्षण प्रमुख या पदाची निर्मिती केली असल्याचं लष्करप्रमुख म्हणाले. या निर्णयामुळे पाकिस्तानचे अधिकाधिक अधिकार आणि शक्ती एकाच व्यक्तीमध्ये सामावली असल्याचंही त्यांनी सांगितलं. यांत्रिकीकरणातील सक्षमता हे भविष्यातील संरक्षण आव्हानांना सामोरं जाण्यासाठी एक महत्वपूर्ण उपाय असल्यामुळे भारतीय सशस्त्र बल आता डेटा आधारित युद्ध कौशल्यावर लक्ष केंद्रित करत आहे, भविष्यातील संघर्षांमध्ये एआय आधारित ड्रोन आणि स्वतंत्र प्रणालींची महत्वपूर्ण भूमिका असेल असं जनरल चौहान म्हणाले.

***

देशसेवेत कर्तव्य बजावत असताना वीरमरण आलेले अकोला जिल्ह्यातील सैनिक नायक वैभव श्रीकृष्ण लहाने यांच्या पार्थिव देहावर काल त्यांच्या मूळ गावी कपिलेश्वर इथं सैनिकी आणि शासकीय इतमामात त्यांच्या अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रशासनाच्या वतीनं तहसीलदार कुणाल झाल्टे, मराठा लाईट इन्फ्रंट्रीचे सीएचएम रामेश्वर पाटील, वैभव लहाने यांच्या कुटुंबियांनी पुष्पचक्र अर्पण केलं. यावेळी सैनिकी विभागाच्या वतीनं मानवंदना देण्यात आली तर पोलिस विभागाच्या वतीनं बंदुकीच्या तीन फैरी झाडून सलामी देण्यात आली.सैनिक नायक वैभव लहाने १२ मराठा लाइट इन्फंट्री या युनिटमध्ये जम्मू काश्मिरमध्ये कुपवाडा सेक्टरमध्ये कार्यरत होते.

***

जालना- छत्रपती संभाजीनगर टोलनाका इथं आचारसंहिता कक्षाच्या सर्वेक्षण पथकानं एका कारमधून ९८ लाख रुपयांची अघोषित रोख रक्कम काल जप्त केली. या कारवाईचा पंचनामा हे एसएसटी पथक आणि चंदनझिरा पोलिस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी केला.निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार छत्रपती संभाजीनगर इथल्या उप आयकर संचालकांना या प्रकरणाची माहिती देण्यात आली.

***

बीड जिल्ह्यातल्या पाटोदा तालुक्यातल्या श्रीक्षेत्र गहिनीनाथगड इथं संत वामनभाऊ यांच्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आज विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. आमदार धनंजय मुंडे या कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

***

तुळजापूर इथल्या तुळजाभवानी मंदिर विकास आरखड्यासाठी राज्यशासनानं एक हजार ८६५ कोटी रुपये निधी मंजूर केला होता. त्यातल्या ५५५ कोटी ८० लाख रुपयांच्या प्रमुख चार कामांच्या निविदेस काल मान्यता देण्यात आली.